**नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०२०**
**नि. क्र. ४७ लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ संकेत संजय सकपाळ यांचा उलटतपास शपथेवर, प्रतिवादीतर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांच्याकडून</u> –**

०८. ''मला बँक ऑफ इंडिया या संस्थेमार्फत दावा दाखल करण्याचा व त्या अनुषंगाने साक्ष देण्याचा अधिकार होता व आहे'' या माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील विधानाबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी जोडलेला नाही. रिझर्व बँकेच्या आदेशानुसार देय झालेले व्याज कर्जदाराच्या खाती खर्च लिहिलेले नसले तरी ती रक्कमही देण्यास प्रतिवादी जबाबदार आहेत, असे दर्शविण्यासाठी रिझर्व बँकेच्या आदेशाचा कोणताही दस्त मी या प्रकरणी सादर केलेला नाही.

०९. दिनांक २९/१०/२०१८ रोजी पूर्वी प्रतिवादीचे कडवई शाखेत झालेल्या व्यवहाराबाबत मला व्यक्तीशः माहिती नाही, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, मला अभिलेखावरुन त्याबाबत माहिती आहे.

१०. फौजदारी खटला क्र. १६/२०१९ बाबत मला व्यक्तीशः माहिती नाही, या तुमच्या सुचनेबाबत माझे सांगणे की, त्याबाबत मला अभिलेखावरुन माहित आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील साक्षीदार क्र. ०१ मुकूंद खांडेकर हे माझे वरीष्ठ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात काय साक्ष द्यायची या संबंधी वरीष्ठांकडून मला सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वरीष्ठांच्या सांगण्याप्रमाणे खोटी साक्ष देत आहे.

१२. फौजदारी खटला क्र. १६/२०१९ या प्रकरणी प्रतिवादीच्या कर्जप्रकरणासंबंधीचे सर्व दस्त परीक्षणकामी मुख्य दस्तऐवज परीक्षक यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, सर्व दस्त पाठविले आहेत अगर कसे हे मला माहित नाही परंतू कर्ज प्रकरणाची दस्त पाठविली आहेत.

**१३**. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ४८ कडील 'Transaction Inquiry' असे शिर्षक असलेल्या दस्तावर माझी स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत खाते उघडण्यात आले त्यावेळी मी कडवई शाखेत कार्यरत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या उताऱ्यात नमूद अनेक व्यवहार हे मी कडवई शाखेत रूजू होण्यापूर्वीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते व्यवहार मी कडवई शाखेत रूजू होण्यापूर्वी झाले असल्यामुळे त्या दस्ताबाबत सांगण्याचे अधिकार मला नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याबाबत सांगू शकत नाही.

**१४**. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ४८ कडील दस्तात असलेल्या प्रमाणपत्रावर माझे नाव नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रमाणपत्रावर दिनांक नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे ते प्रमाणपत्र कायदेशीर नाही.

**१५**. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणी साक्ष देण्याचे अधिकार बँकेने मला दिल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.11.15 17:59:14 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक १५.११.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 15/11/2024 |
| Evidence signed by PO. on | :- | 15/11/2024 |
| Evidence uploaded on | :- | 15/11/2024 |